प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड, न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701
एक वेळ अवश्य भेट द्या 8459953702

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● बुधवार ३१ जूले २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३१९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भीड दैनिक
मो.न.9422660077

# प्रकाश आंबेडकरांसोबतच्या भेटीत नेमकी काय चर्चा; पंकजा मुंडे म्हणाल्या, राजकारणामध्ये?

भाजपच्या विधानपरिषदेच्या आमदार पंकजा मुंडे आणि वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर यांची भेट झाली. लातूर बीड रस्त्यावर या दोन नेत्यांची भेट झाली. यावेळी पंकजा मुंडे यांनी आंबेडकरांच्या आरक्षण बचाव यात्रेला शुभेच्छा दिल्या. यातचे फोटो पंकजा मुंडे यांनी शेअर केले आहेत. या भेटीत नेमकी कोणत्या मुद्द्यांवर चर्चा झाली? याचीही माहिती पंकजा मुंडे यांनी दिली आहे. भाजपच्या बैठकीतील मुद्द्यांवरही पंकजा मुंडे यांनी भाष्य केलं. लाडकी बहीण योजनेवर विरोधकांकडून होणाऱ्या टीकेलाही पंकजा मुंडेंनी उत्तर दिलंय. लातूरमध्ये पंकजा मुंडे माध्यमांशी बोलत होत्या.

## पंकजा मुंडे- प्रकाश आंबेडकर भेटीत काय चर्चा?

आमची भेट अत्यंत योगायोगाने झाली होती. मी लातूरकडे येत होते आणि ते कदाचित बीडकडे जात होते. त्यांना पाहिल्यानंतर मी त्यांना भेटून शुभेच्छा दिल्या. त्यांची यात्रा सुरू आहे. त्यामुळे त्यांना शुभेच्छा दिल्या. या भेटीमध्ये आमचा सहज आणि घरगुती संवाद होता, असं पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. राजकारणामध्ये वंचितांना, ज्यांचा आवाज कोणीच ऐकू शकत नाही. त्यांना शक्ती देण्यासाठी गोपीनाथ मुंडेसाहेब राजकारणात आले होते. मुंडेसाहेबांनी अशा लोकांना, समाजाला संधी दिली ते काम आम्ही पुढे करत राहू, असंही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.



## भाजपच्या बैठकीत कोणत्या मुद्द्यांवर चर्चा

भाजपच्या बैठकीतील मुद्द्यांवर पंकजा मुंडे बोलत्या झाल्या. नांदेड, धाराशिव, बीड आणि लातूर जिल्ह्यातील संघटनात्मक बैठक पार पडली. मराठवाड्यातील 250 ते 300 पदाधिकारी, आमदार बैठकीत सहभागी झाल्या. अर्थसंकल्पात झालेल्या तरतुदी, बोगस मतदार नोंदणी रोखणे यावर मार्गदर्शन केलं, असं पंकजा मुंडे म्हणाल्या.मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवर विरोधक टीका करत आहेत. याला पंकजा मुंडेंनी उत्तर दिलंय. लाडकी बहीण योजनेवर विरोधक टीका करत आहेत. मात्र तेच लोक त्याचा फॉर्म भरून घेण्यासाठी गडबड करत आहेत. लाडकी बहीण योजना अत्यंत चांगली असून महाराष्ट्रातील महिलांमध्ये चांगलं वातावरण आहे, असं पंकजा मुंडे यांनी सांगितलं आहे.

# घळाटवाडीच्या नदीवर दीड कोटीचा बंधारा बांधला मात्र २ वर्षापासुन गेट बसवले नाहीत आमदार, लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष



**माजलगाव दि. ३० (प्रतिनिधी)** तालुक्यातील घळाटवाडी नदीवर दोन वर्षांपूर्वी दीड कोटी रुपयांचा शासनाचा निधी खर्च करून बंधारा बांधण्यात आला आहे परंतु या बंधाऱ्याला गेटच बसवले नसल्यामुळे या बंधाऱ्यात एक थेंबही पाणी राहत नाही गेट न बसवल्यामुळे शासनाचा दीड कोटी रुपयांचा निधी पाण्यात गेला आहे असेच म्हणावे लागेल सदर बंधाऱ्याला तात्काळ गेट बसून यावर्षी पाणी साठवावे अशी मागणी युवा सेनेचे उपतालुकाप्रमुख रामेश्वर काशीद यांनी केली आहे.प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की घळाटवाडी येथील नदीवर



बांधण्यात आलेला बंधारा दीड कोटीचा दोन वर्षापासून आलेले पाणी वाहून जात आहे त्याला गेट न टाकल्यामुळे लोक प्रतिनिधी याकडे दुर्लक्ष करित आहे नदीच रूंदीकरण केलेले आहे पण गेट न टाकल्यामुळे मध्ये पाणी साचत नाही आणि पाणी पुढे निघून जात आहे यंदाच्या जरी पावसाळ्यात गेट टाकले तर गावकऱ्यांना यांचा फायदा होईल म्हणून आमदार लोकप्रतिनिधी यांनी तात्काळ लक्ष घालून या बंधाऱ्याला गेट बसवावेत अशी मागणी युवा सेना तालुका उपप्रमुख रामेश्वर आसाराम काशिद यांनी केली आहे.

# सततच्या पावसामुळे आणि सुर्यप्रकाश नसल्यामुळे पेरणी झालेली खरीपाची पिके वाया गेली
## त्याचे पंचनामे करुन शासन किंवा विमा कंपनीकडुन नैसर्गिक आपत्ती म्हणुन भरपाई मिळावी-भाई विष्णुपंत घोलप

**पाटोदा (प्रतिनिधी)** बीड जिल्ह्यात 2024-25 च्या खरीप हंगामाची पेरणी जुनचा दुसरा पंधरवाडा आणि जुलैच्या पहिल्या आठवड्यात जवळपास पुर्ण झाल्या आहेत. त्यानंतर सतत गेल्या 20 दिवसापासुन म्हणजे जवळपास तीन आठवडे सतत काही ठिकाणी रिमझीम तर काही ठिकाणी मोठा पाऊस पडला खरीपाचे पिक उगवल्यानंतर मागील 15 ते 20 दिवस बीड जिल्ह्यात सुर्यदर्शन झाले नाही त्यामुळे पिकाची वाढ खुंटली,काही ठिकाणी पाणी जास्त झाल्यामुळे पिकाची मुळे सडली तसेच पिक पिवळी पडली आणि पिकावर रोगराई वाढली त्यामुळे बीड जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांना ह्या नुकसानीचा फटका बसला असुन त्या शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ आर्थिक



मदत करणे गरजेचे आहे. त्यासाठी मा.जिल्हाधिकारी साहेबांनी तात्काळ कृषीविभाग,महसुल आणि विमा कंपनी यांना पंचनाम्याचे आदेश देऊन शेतकऱ्यांना संकटातुन वाचवावे. ई-पीक पाहणीचे सर्व्हर हे 1 ऑगस्ट पासून सुरु होणार आहे असे प्रशासनाच्या वतीने मागिल काही दिवसापुर्वी शेतकऱ्यांना कळविले आहे. उदा. नुकसानीसाठी पाटोदा तालुक्याच्या सर्वच भागात खरीप पिकाचे नुकसान झालेले असुन आपण प्रशासनाला पंचनाम्याचे तात्काळ आदेश दिल्यास बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकाच्या नुकसानीचा अंदाज येईल असे लेखी निवेदनाव्दारे उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा मार्फत जिल्हाधिकारी बीड यांना भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी कळविले आहे. माहितीस्तव माहितीस्तव राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री मुंडे साहेब व शेकापचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील आणि बीड जिल्ह्याचे खासदार मा.बजरंग(बप्पा) सोनवणे यांना दिले आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची संवाद यात्रा



**अकोला** : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची संवाद यात्रा मंगळवारी (दी.30) दुपारी अकोला येथे पोहोचली. यावेळी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पत्रकार परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या पत्रकारांना संवाद यात्रेचा उद्देश, पत्रकारांचे प्रश्न याबाबत माहिती दिली. यावेळी सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रवीण सपकाळे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर तसेच अकोला जिल्हाध्यक्ष गणेश सुरजुसे, देवानंद गहिले, सम्राट वानखेडे, नागेश भालतिलक, रामजी श्रीवास, अजय सोळंके, जगन्नाथ कोल्हे, लक्ष्मण सपकाळ, सय्यद हसन बाबू व स्थानिक पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी उमेदवारांना सहा महिन्याचा वाढीव कालावधी

**बीड,** दि. 30, : राज्यात सध्या सुरु असलेल्या सन 2024-25 मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी ( अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन सदर शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायीक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासुन सहा महिन्यांचा कालावधी देण्यात येत आहे. सदर सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये संबंधित उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द होतील व त्याबाबत संबंधित उमेदवार जबाबदार राहतील. याची खबरदारी घ्यावी त्याप्रमाणे लवकरात लवकर जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन उपायुक्त तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य एस आर मकरंद यांनी केले आहे महाराष्ट्र राज्य विधानमंडळाने दिनांक 20 फेब्रुवारी, 2024 रोजी विशेष अधिवेशन घेऊन महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम, 2024 (एसईबीसी आरक्षण अधिनियम 2024) एकमताने संमत केला आहे. दिनांक 26 फेब्रुवारी 2024 पासून सदर अधिनियम अंमलात आला आहे. सदर अधिनियमाच्या कलम 5 अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी राज्यातील शैक्षणिक संस्थामधील प्रवेशामध्ये तसेच राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय व निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये 10 % टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. राज्यात सध्या विविध महाविद्यालयांत सुरु असलेल्या शैक्षणिक संस्थामधील प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यास उमेदवारांना अडचणी येत असल्याबाबत काही लोकप्रतिनिधी तसेच उमेदवारांकडून निवेदने प्राप्त झालेली आहेत. त्यानुसार शासनाने ही बाब लक्षात घेऊन सहा महिन्याचा कालावधी वाढविला आहे.

# दाऊदला भर चौकात फाशी द्या- प्रितम म्हात्रे अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांच्या मुस्क्या आवळाव्या



/प्रतिनिधी

तीन दिवसांपूर्वी नवी मुंबईत यशश्री शिंदे नावाच्या वीस वर्षीय तरुणीची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली होती. या घटनेनं संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. या प्रकरणातील आरोपी दाऊद शेख हा यशश्रीची हत्या करून कर्नाटकमध्ये पळून गेला होता. अखेर नवी मुंबई पोलिसांनी कर्नाटकमध्ये जाऊन आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. यशश्री शिंदे च्या कुटुंबीयांची आज शेतकरी कामगार पक्षाचे नेते श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी भेट घेतली. त्यांचे सांत्वन करतानाच आरोपीला फक्त फाशीच नाही तर ती भर चौकात फाशी दिली गेली पाहिजे जेणेकरून भविष्यात अशा प्रकारचे कृत्य करण्याचा कोणी धजावणार नाही अशा प्रकारची तीव्र शब्दात भावना त्यांनी व्यक्त केली.

रविवारी उरण मधील नागरिकांच्या वतीने काढण्यात आलेल्या निषेध मोर्चात ते सहभागी झाले होते. सदर गंभीर विषयात बोलताना त्यांनी सांगितले अशा प्रकारचे घटना घडण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहे. आजची तरुण पिढी नशेच्या अधीन झाली आहे. उरण-पनवेल परिसरात सर्रासपणे गांजा आणि इतर नशेडी पदार्थ तरुणांना सहज उपलब्ध होत आहेत. ही बाब अत्यंत गंभीर आहे. यावर लवकरच उपाययोजना सरकारने करणे अपेक्षित आहे. तर त्यांनी अशा प्रकारच्या अनेक घटना आपल्या परिसरात आत्ताही घडत असतील

### नशेच्या अधीन होऊन तरुण पिढी बिघडत आहे.

मानखुर्द गोवंडी येथून हे अंमली पदार्थ विक्रेते रेल्वेने येतात आजूबाजूच्या परिसरातील ठराविक चहा-पान टपऱ्या, इस्त्रीवाले, ठराविक नाके या ठिकाणी चरस गांजा तरुणांना उपलब्ध करून देतात. प्रथमतः हे अड्डे उध्वस्त केले पाहिजे. आम्ही स्वतः नवीन पनवेल, अमेटी कॉलेज, खारघर, उलवे नोड पासून सुरुवात केली आहे. नागरिकांना मी आवाहन करीन आपल्या नजरेस असे काही आढळल्यास थेट आमच्याशी संपर्क साधा आपण कायद्याच्या चौकटीत ते उध्वस्त करण्याचा पूर्ण बंदोबस्त करू जेणेकरून आपली तरुण पिढी भविष्यात व्यसनाधीन होणार नाही:-

श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे खजिनदार
शेतकरी कामगार पक्ष रायगड

मी अशा सर्व तरुणी आणि त्यांच्या पालकांना आवाहन करू इच्छितो की कुठल्याही दडपणाखाली न राहता आपण ते पोलिसांशी संपर्क साधून आपल्या समस्या व्यक्त कराव्या. जेणेकरून अजून नवीन दाऊद शेख तयार होण्याच्या अगोदरच ठेचला जाईल. अशा अडचणीच्या वेळी पोलीस प्रशासना सोबतच आम्ही सर्व तुमच्या सोबत आहोत आमच्याशी कधीही संपर्क साधा. या गंभीर गुन्ह्यात पोलिसांनी कार्यतत्परता दाखवून आरोपीच्या मुस्क्या आवळल्या त्याबद्दल त्यांचेही आभार. मला न्याय व्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे त्याला फाशीच मिळेल ही आमची मुख्य मागणी पूर्ण होईल.

## जिल्हा परिषद शाळा टोकावडे येथे शैक्षणिक साहित्य वाटप



मुरबाड तालुका प्रतिनिधी

मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा टोकावडे येथे शांता नारायण चॅरिटेबल ट्रस्ट व सामाजिक कार्यकर्ते महेश भांगे यांच्या पुढाकाराने शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले ,यामध्ये विद्यार्थ्यांना पेन पेन्सिल, वह्या, स्कूल बॅग यांचे वाटप करण्यात आले या वेळी शांता नारायण संस्थेच्या अध्यक्ष कांचन शिंदे मॅडम यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, शैक्षणिक प्रगती व्हावी या उद्देशाने संस्था अशा सेवा भावी उपक्रम राबवीत असल्याचे सांगितले ,मुलांशी हितगुज करून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची उजळणी घेतली या वेळी संस्थेच्या अध्यक्ष कांचन शिंदे मॅडम, शशांक सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते महेश भांगे, भवनजी कांबळे, आश्विनी हिवाळे, संदीप पवार, गणेश पवार ,शाळेचे मुख्याध्यापक संभाजी पवार, इतर सहशिक्षक मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते शाळेचे मुख्याध्यापक पवार सर यांनी शांता नारायण चॅरिटेबल ट्रस्ट व सामाजिक कार्यकर्ते महेश भांगे यांचे आभार मानले ....

## पेण शहरातील विविध समस्यांबाबत भाजप कार्यकर्त्यांचे नगरपालिका प्रशासनाला निवेदन
## प्रशासनाने योग्य मार्ग काढून नागरिकांच्या समस्या सोडवा - अनिरुद्ध पाटील

नागरिकांच्या समस्या लक्षात घेवून योग्य ती खबरदारी घेतली जाईल तसेच योग्य उपाययोजना राबवून समस्या सोडविण्यात येतील. गटार नाले सफाई बाबत पुन्हा कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या जातील. त्याचप्रमाणे लवकर शासनाच्या परवानगी नंतर नवीन पाण्याची योजना राबविली जाणार आहे त्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत पण येत्या एक दीड वर्षात शहराला मुबलक पाणी पुरवठा होईल असा आराखडा तयार करण्यात आला आहे.

जिवन पाटील - मुख्याधिकारी, पेण नगरपरिषद



पेण प्रतिनिधी

पेण शहराचे वाढते नागरीकरण बघता नागरीकांना अनेक समस्या आता भेडसावू लागल्याने नागरिक हैराण झाले आहेत. सध्या नगरपालिकेत प्रशासक अधिकारी असल्याने या समस्या सोडविण्यासाठी पेण शहर भाजप कार्यकर्त्यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांची भेट घेवून निवेदन दिले आहे.

पेण शहरात पाणीपुरवठा योग्य व सुरळीत होत नाही, गॅस पाईपलाईनचे काम करताना खणलेले खड्डे योग्य प्रकारे भरले जात नाहीत,शहरातील गटार योजनेचे नियोजन व विस्तार करणे बाबत, रोहित कॉम्प्लेक्स जवळील रस्ता ते सुतरवडी, शिवाजी नगर रस्ता ( रामवाडी ) पडलेले खड्डे, संत आळी गटार बंदिस्त नाही व स्ट्रीट लाईट नाही,कुंभार आळी व कवंडाळ तलावातील कारंजे बंद अवस्थेत आहेत,समर्थ नगर ते रामवाडी रस्त्याची लाईट बंद असते व कचरा गाडी नियमीत येत नाही,कवंडाळ तळे सुशोभिकरण व जॉगींग ट्रॅक लगतची साफसफाई योग्यरित्या होत नाही,कवंडाळ तळे परिसरातील रस्त्यावर खूप खड्डे आहेत. परंतू कोणतीही उपाययोजना होत नाही, साई मंदिर येथील जॉगींग ट्रॅकमध्ये येणारे पाणी वाहून जाण्याकरीता योग्य व्यवस्था केलेली नाही, तेरा घरांची आळी येथील गटार योग्य नाही, ब्लिचिंग पावडरचा वापर योग्य होत नाही अश्या समस्यांबाबत चर्चा करण्यात आली असून तातडीने कार्यवाही व उपाययोजना करण्यात यावी यासाठी निवेदन देण्यात आले आहे.

गेली दोन वर्षापासून नगरपरिषद निवडणूक झाली नसल्याने संपूर्ण अधिकार प्रशासनाकडे आहे.परंतु सर्वसामान्य नागरिक हे आमच्याकडे प्रश्न विचारतात त्यामुळे नागरिकांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्ही मुख्याधिकाऱ्यांची भेट घेवून त्यांना योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी पत्र दिले आहे असे माजी गटनेते अनिरुध्द पाटील यांनी सांगितले.

## प्राथमिक शिक्षक परिषदेच्या जिल्हाध्यक्ष पदी उदय शंकर गायकवाड यांची बिनविरोध निवड

बोरघर / माणगाव

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी उदय गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आ. संजय केळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत महाड येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय अधिवेशनात नवीन कार्यकारीणीची घोषणा राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांनी केली.

यावेळी जिल्हा कार्यवाह म्हणून विजय पवार, जिल्हा कार्यकारी अध्यक्ष उमेश महाडेश्वर, भिकाजी मांढरे, सुशील वाघमारे, कार्याध्यक्ष गजानन देवकर, कोषाध्यक्ष संजय कोंडविलकर, जिल्हा संघटन मंत्री दिलीप पाटील, जिल्हा कार्यालय चिटणीस सुधाकर करकरे, जिल्हा महिला आघाडी दिप्ती गावंड, रेश्मा घुमाळ, स्मिती जोष्टे, विजया सावंत, स्मिता पाटील, प्रसिदधी प्रमुख बालाजी गुबनारे यांची निवड जाहीर करण्यात आली.



जिल्हा उपाध्यक्ष म्हणून प्रशांत तुळसुळकर, रमेश देठे, प्रदीप आडीत, प्रशांत मोरे, अमोल केतकर, राजेंद्र खामकर, संजय पोईलकर, अंकुश पाटील, प्रियंका हरवंदे, जिल्हा संघटक समीर मुल्ला. हेमंत सारदळ, अशोक जाधव, प्रशांत वाणी, महेंद्र सातमकर, नितीन जाधव आदिंच्या नावाची घोषणा करण्यात आली.

महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात पार पडलेल्या या अधिवेशनात प्राथमिक शिक्षकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांवर चर्चा झाली. शिवाय महत्वाचे ठराव पारीत करण्यात आले. पनवेल महापालिका क्षेत्रात कार्यरत शिक्षकांना महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये सामावून घ्यावे, १५ मार्च २०२४ चा नवीन संच मान्यता जीआर रदद करावा, नवभारत साक्षरता कार्यक्रमांवर बहिष्कार, शनिवार व इतर सकाळच्या वेळेतील प्राथमिक शाळांची वेळ ७:३० ते ११ अशी करावी अशा मागण्यां बाबतचे ठराव मांडून मंजूर करण्यात आले. खुल्या अधिवेशनात विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी सदस्य यांनी शिक्षक परिषदेत प्रवेश केला. आ. संजय केळकर व राजेश सुर्वे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी जिल्ह्यातील परिषदेचे सदस्य शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महानगरपालिका आयूक्त आता तरी लक्ष देतील काय ?

पुणे/प्रतिनिधी

पुणे शहरात सतत संतधार पाऊस आणि यात खडकवासला धरनातून पाणी सोडण्यात आले पाणी सोडणारे आणि मनपा मध्ये समव्वय नसल्याचे दिसते शहरात अनेक ठिकाणी सोसायट्या मध्ये आणि रोडवर पाणी साचले होते यात मनपाचे अकार्यक्षम धारण पूढे येत आहे पावसाळ्यापुर्वी फक्त सभा घेण्यातच भर देण्याचा प्रकार यांच्या कडून दिसत होता प्रत्यक्षात पाणी शहरात घूसल्यानंतर यांचे पुणे मनपा आणि क्षेत्रीय कार्यालयाचे वाभाडे पुढे आले• पुणे शहरात अतिवृष्टी झाल्यानंतरही पुणे आणि क्षेत्रीय कार्यालयाचे अकार्यक्षम दिसून आले यात प्रत्यक्षात धरणाचे पाणी सोडणार याची कल्पना मनपा आयुक्तांना नव्हती काय ? मग पाणी सोडण्यापुर्वी सिहगड,एकता नगर,संगमवाडी,पाटीलस्टेट, दांडेकरपूल ,शिवाजीनगर,दत्तवाडी,विश्रांतवाडी,शांतीनगर झोपडपट्टी या विभागात अनेक ठिकाणी गृहनिर्माण संस्थानमध्ये पाणी घूसले होते तर अनेक ठिकाणी प्रशासनाचे अधिकारी याबाबत अकार्यक्षम धोरण दिसत होते लहान लहान घरात पाणी साचल्यानंतर यांचे घरात असलेले सर्व साहित्य पाण्यामध्ये खराब होऊन घरात गाळ साचलेले होते मनपाचे आयुक्त पावसाळ्यापुर्वी आढावा बैठका घेतात मग प्रत्यक्षात कृती का केली जात नाही दोन तीन मनपाचे क्षेत्रीय कार्यालया अंतरगतच मनपाने लक्ष दिले यात प्रत्यक्षात संगमवाडी,बाणेर,पाषाण,औध, बालेवाडी या ठिकाणी साचलेल्या रोडवर पाण्या बाबत आणि अनेक ठिकाणी सोसायट्यामध्ये साचलेल्या पाण्या बाबत दूर्लक्ष करण्याचा प्रकार घडला या विभागातिल क्षेत्रीय



कार्यालय अकार्यक्षम दिसत होते• पुण्यातिल प्रत्येक क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत धोरण दिसत आहे नालेसफाई नावापूरती झालेली आहे •यात चेंबरची दूरावस्था ,नाली सफाई नावापूरती झाली,अनेक ठिकाणी खड्डे बूजविले असे कागदोपत्री दाखवण्यात आले ते खड्डे आज एका पावसात ऊघड झाले आहे •शहरातील क्षेत्रीय कार्यालयावर मनपा आयुक्तांचे अंकूशच नाही• जागोजागी रोडवर पाणी साचते याचे नियोजन कागदोपत्री आणि टेंडर काढायपूरतेच दिसत होते ठेकेदारांनी कामे प्रत्यक्षात केली किंवा नाही याचे घेणेदेणे आयुक्ताना नसल्याचे दिसत आहे•शहरात रोडवर पाणीसाचणे, अनेक ठिकाणी शहरात खड्डे , खडवासलातून मुठा नदीत पाणी याची कल्पना आयुक्तांना नव्हती काय मग होती तर संबंधीत सखल भागात पाणी घूसणार याची सूचना का केली नाही या अनेक कारभाराबाबत मनपाचे आयुक्त दोषी आहे • शहरात अनेक ठिकाणी खड्डे, पाणी साचण्याचा प्रकार,नाले सफाई नावापूरते,नाली सफाई नाही, चेम्बरचे झाकणे मातीने बंद आणि जागोजागी रोडवर कचरा दसाचलेला , अडथळा असणारे झाडेतोड नावापूरती ,क्षेत्रीय कार्यालयावर अंकूसनसणे याबाबत महानगरपालीकेचे आयुक्त लक्ष देऊन योग्यती कारवाई करून कामचूकार करणारे कर्मचारीवर कारवाई करतील काय ?

# पाच एकर कपाशी पिकांवर तण नाशक फवारले अज्ञातांनी केला नांदगाव शिवारात खोडसाळपणा

**छत्रपती संभाजीनगर**
सोयगाव तालुक्यातील नांदगाव शिवारात अज्ञातांनी खोडसाळपणा करून वीस एकर क्षेत्रापैकी पाच एकर क्षेत्रावरील कपाशीच्या पिकांवर तण नाशक फवारणी केल्याची घटना शुक्रवारी उघडकीस आली. याप्रकारामुळे शनिवारी पाच एकर वरील कपाशीची पिके जळून उध्वस्त झाली आहे. याप्रकरणी अज्ञात विरुद्ध सोयगाव पोलीस ठाण्यात शनिवारी तक्रार दिली आहे.

नांदगाव शिवारात साहेबराव निंबाळकर यांची गट क्र ७० ठोक्याने केलेली वीस एकर शेती आहे. या वीस एकर क्षेत्रात त्यांनी कपाशी ची लागवड केली आहे. गुरुवारी शुक्रवारी अज्ञातांनी त्यांच्या शेतात खोडसाळ पणाने तण नाशक फवारणी केली. त्यातील पाच एकरवरील कपाशीची पिके उभी जळून गेल्याचा प्रकार शनिवारी सकाळी साहेबराव निंबाळकर यांना आढळून आला दरम्यान शेतकरी साहेबराव निंबाळकर यांनी नुकतीच बुधवारी वीस एकर वर कपाशी पिकांवर कपाशी रोगमुक्त व निरोगी राहण्यासाठी इतर औषधं फवारणी केली होती.मात्र शनिवारी त्यांना पाच



एकर वरील कपाशी जळून गेल्याचे आढळून आले व इतर पंधरा एकर कपाशी टवटवीत दिसली त्यामुळे अज्ञातांनी खोडसाळ पणा करून नुकसान केल्याची तक्रार साहेबराव निंबाळकर यांनी दिली आहे.

# श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेजची इंडस्ट्रियल व्हिजिट संपन्न थर्मल पावर स्टेशनमध्ये वीजनिर्मिती बाबत घेतली इत्यंभूत माहिती



**(परळी-प्रतिनिधी)-** तालुक्यातील हाळम येथे गेल्या वर्षीपासून कार्यरत असलेल्या श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेज या संस्थेच्या विद्यार्थ्यांची इंडस्ट्रियल व्हिजिट संपन्न झाली याबाबत सविस्तर माहिती अशी की श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेज हाळम येथे गेल्यावर्षीपासून कार्यरत आहे या कॉलेजमधून इलेक्ट्रिशियन, वायरमन, व सोलर टेक्निशियन सारखे विद्युत क्षेत्राशी निगडित असणारे अभ्यासक्रम शिकविले जातात त्यांच्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडावी या उद्देशाने वेगवेगळ्या औद्योगिक सहली आयोजित केल्या जातात. त्याचाच एक भाग म्हणून आशिया खंडात नावाजलेले परळी येथील औष्णिक विद्युत केंद्र येथे या विद्यार्थ्यांची "इंडस्ट्रियल व्हिजिट" संपन्न झाली यावेळी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातील अधिकाऱ्यांनी आयटीआयच्या विद्यार्थ्यांना विद्युत निर्मिती कशी होते याबाबत सखोल माहिती दिली. तसेच यावेळी श्री वैद्यनाथ आयटीआयचे प्राचार्य पिंपळे सर ,हाके सर, दहिफळे सर, मुंडे सर व विद्यार्थी उपस्थित होते

# रवि काका ढोबळे यांनी घेतली जरांगे पाटील यांची भेट !



**आष्टी /प्रतिनिधी** छत्रपती संभाजी नगर येथील गॅलेक्सी हॉस्पिटल येथे दि.२४ जुलै २०२४ रोजी मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांची आष्टी कॉंग्रेस तालुक्याध्यक्ष रवि काका ढोबळे यांनी भेट घेतली. उपोषणाने प्रकृती खालावल्याने त्यांची तब्येत तेवढी चांगली नाही.परंतु हळूहळू त्यात सुधारणा होत आहे. तब्येतीची काळजी घ्या,असा आग्रह रवि काका यांनी केला.मनोजदादा लवकरच उपचारानंतर बाहेर पडून समाजाच्या आंदोलनात सक्रिय होतील.दादांची भेट नेहमीच ऊर्जा देणारी असते.यावेळी हॉस्पिटल मधील डॉक्टरांची व स्टाफची भेट घेऊन मनोजदादांवर सुरू असलेल्या उपचारांची आष्टी तालुकाध्यक्ष रवि काका ढोबळे यांनी माहिती घेतली.

# एक झाड आईच्या नावे उपक्रमा अंतर्गत अकराहजार वृक्ष लागवड

**हिंगोली :- (प्रतिनीधी )**
ग्लोबल वार्मिंगचा दुष्परिणाम कमी व्हावा या उद्देशाने एक झाड आईचे नावे या उपक्रमांतर्ग भारतरत्न राष्ट्रपती राष्ट्रऋषी नानाजी देशमुख चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून अकरा हजार वृक्ष लागवड करणार असल्याचा संकल्प केला आहे. अशी माहिती २९ जुलै रोजी संस्थापक अध्यक्ष रामदास पाटील सुमठाणकर यांनी पत्रकार परिषदेत दीली .'एक वृक्ष आपल्या आईच्या नावे' या अभियानांतर्गत ११ हजार वृक्ष ज्यामध्ये वड, पिंपळ, करंज, नारळ, कडूलिंब, कडीपत्ता, जांब, मेंहदी, लिंबू, आंबा, बेल आदी वृक्ष उपलब्ध झाले आहेत. सदरील वृक्ष हिंगोली शहरातील सेवाभावी संस्था, शाळा आणि हिंगोली तालुक्यातील ग्रामपंचायतीला प्रत्येकी पाच झाडे देण्याचा संकल्प त्यांनी बोलून दाखविला १ ऑगस्ट पासून मोफत घरपोच दिले जाणार आहेत.ज्या पर्यावरण प्रेमीना खरच 'एक झाड आपल्या आईच्या नावे' लावून संवर्धन करावयाचे असल्यास त्यांनी संपर्क साधावा, त्याचप्रमाणे काही संस्था, सोसायटी, मंडळांना देखील व्यापक स्वरूपात वृक्ष लागवड करण्या करीता वृक्ष उपलब्ध करून दिले जाणार आहेत. तसेच पाऊस संपल्यानंतर वृक्षांना वाचविण्यासाठी एक मोफत टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे. या सुरू करण्यात आलेल्या उपक्रमात वृक्ष लागवड आणि संवर्धन चळवळीमध्ये सर्व वृक्षप्रेमीनी सहभागी होऊन हिंगोली शहर व परीसर हिरवागार करण्याकरीता सहकार्य करावे असे आवाहन हिंगोली भाजपा लोकसभा प्रमुख तथा भारतरत्न नानाजी देशमुख चारिटेबल ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष रामदास पाटील



# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल मध्ये कारगिल विजय दिवसानिमित्त वैयक्तिक गीत गायन स्पर्धांचे आयोजन



**परळी(प्रतिनिधी)** : दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल परळी वैजनाथ येथे दरवर्षीप्रमाणे कारगिल विजय दिवसानिमित्त वैयक्तिक गीत गायन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले . या प्रसंगी प्रशालेतील इयत्ता चौथी ते पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला .

यानुषंगाने आज प्राथमिक गटासाठी सदर स्पर्धा आयोजित करण्यात आली, या स्पर्धेत इयत्ता चौथीतील कु.आरोही पाटील व कु.अंश राज यांनी प्रथम क्रमांक तर कु.आदित्य गित्ते व कु. श्रीरंग देशपांडे यांनी द्वितीय तर कु.अवणी मुंडे हिने त्रितीय क्रमांक प्राप्त केला. इयत्ता पाचवी मधिल कु.अनुश्री पुष्पलवार व कु. अक्षता रंजन यांनी प्रथम क्रमांक तर कु.श्लोक नानवते व कु.यशश्री दौंड यांनी द्वितीय तर कु.श्रावणी कांदे व कु. वेद चाटे त्रितीय क्रमांक प्राप्त केला. याप्रसंगी परीक्षक म्हणून बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध शास्त्रीय संगीत गायक व वादक श्री.दिनेश कुमार काळे सर (संगीत विशारद) व प्रशालेचे संगीत शिक्षक श्री. गणेश कांबळे सर त्याचबरोबर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. श्रीकांत पाटील सर व कलाविभाग प्रमुख श्री.प्रसाद देशपांडे सर यांची उपस्थिती तर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे विषेश सहकार्य लाभले या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील उपजत गायन, वादन,नृत्य या कलागुणांना वाव मिळवा या उद्देशने वरील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक विवेकानंद युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.ऊषा किरण गित्ते तसेच प्रशालेचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक मा. श्री. किरण गित्ते साहेब (सचिव, नगरविकास सार्वजनिक बांधकाम उद्योग पर्यटन विभाग त्रिपुरा सरकार) त्याचबरोबर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.श्रीकांत पाटील यांनी केले.

# दत्ता विसवळे यांनी माजलगाव विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरावे ही सामान्य जनतेची इच्छा !

**माजलगाव प्रतिनिधी.**
माजलगाव तालुक्यातील धडाडीचे ओबीसी नेता म्हणून ओळख असलेले दत्ता विसवळे यांची माजलगाव मतदार संघात सध्या विधानसभेसाठी जोरदार चर्चा चालू असून येत्या काळात ते आमदार दिसतील असे सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे व प्रस्थापितासाठी नव्हे तर लोकशाहीत सर्वांना मुभा असते. याचे भान प्रस्थापितांना राहिले नाही. राजकीय मक्तेदारी मोडीत काढावी लागेल गेल्या लोकसभेत निवडणुकीत संधी हुकली ती आता हुकु द्यायची नाही. संधी दार ठोठावत असते हे सत्य असले तरी आज स्पर्धेच्या युगात तर दार तोडून संधी मिळवावी लागते. प्रसंगी घुसखोरावर मात करून गरुड भरारी घ्यावी लागते. माजलगाव मतदार संघाचा पल्ला गाठण्यासाठी दत्ता विसवळे यांची पुरेपूर तयारी झाली आहे. हट्ट करणं वाईट असतं पण कांही वेळी कांही हट्ट गुणकारी ठरतात. राजकीय दिशा ओळखून दूर दृष्टीने निर्णय घेऊन सकारात्मक पाऊल उचलण्याच्या निष्ठांतपणा त्यांच्या व्यक्तिमत्वात आहे. लोकांना गृहीत धरून एकाधिकारशाहीच राजकारण करणाऱ्यांना शह देत



लोकांच्या मनातले प्रश्न ओळखुन लोक भावना हाताळून निर्णय घेत लक्ष गाठण्यासाठी वाटचाल चालू आहे. निस्वार्थ भावनेतून कर्तव्य निभावत जन प्रेम उभा केल आहे. जनसेवा आणि थेट संपर्क ही अत्यंत साधी रणनिती ठेवून कायम जनतेची नाळ जोडली आहे.समस्या निर्मूलनासाठी यश अपयशाची परवा न करता लोकशाही मार्गाने संघर्ष चालू आहे. समाजकारण आणि राजकारणाच्या माध्यमातून केलेली सेवा वेळोवेळी साधलेला संवाद व संपर्क यामुळे निर्माण झालेली लोकशक्ती प्रचलित प्रस्थापितांना गारद करण्यासाठी माजलगाव सज्ज आहे. राजकीय मक्तेदारी व दहशतीखाली दबलेला काही मतदार वर्ग खुल्या मनाने बोलत नसला तरी निवडणुकीच्या रणधूमाळीत भय मुक्तीसाठी दत्ता विसावळे यांना बिनधास्त मतदान करेल. आज. घडीची राजकीय परिस्थिती लक्षात घेता दता विसावळे यांच्या जिद्दीला माजलगाव यांची साथ निश्चित लाभू शकते. हे मात्र खरे आहे

# मातोश्रीबाहेर आंदोलन करु नका, अन्यथा, पोलिसांकडून मराठा आंदोलकांना नोटीस

## मराठा क्रांती ठोक मोर्च्याच्या पदाधिकाऱ्यांना नोटीस

**याप्रकरणी आता मुंबईतील खेरवाडी पोलिसांकडून मराठा क्रांती ठोक मोर्च्याच्या पदाधिकाऱ्यांना नोटीस पाठवण्यात आले आहे. मातोश्रीबाहेर कोणताही जमाव किंवा आंदोलन करु नका, अशी नोटीस पोलिसांनी दिली आहे. आपण मातोश्री बंगला याठिकाणी कोणतेही आंदोलन करू नये, असे पोलिसांनी यात म्हटले आहे. आपण किंवा आपले समर्थक/कार्यकर्ते यांच्याकडून अशी कोणतीही कृती घडल्यास, त्यायोगे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यास अथवा सार्वजनिक शांततेस बाधा निर्माण झाल्यास त्याबाबत आपणास जबाबदार धरले जाईल. तसेच याविरुद्ध कायदयान्वये ठोस कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या नोटीसचा वापर आपल्या विरुद्ध पुरावा म्हणून करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे खेरवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मुळीक यांनी म्हटले आहे.**

शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांनी मराठा आरक्षणाबद्दल त्यांची भूमिका स्पष्ट करावी, यासाठी मराठा कार्यकर्त्यांकडून आज मातोश्रीबाहेर आंदोलन करण्यात येणार आहे. याच पार्श्वभूमीवर मराठा क्रांती ठोक मोर्च्याच्या पदाधिकाऱ्यांना मुंबईतील खेरवाडी पोलिसांनी नोटीस बजावली आहे. शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांचे निवासस्थान असलेल्या मातोश्री बंगल्याबाहेर जमाव अथवा आंदोलन करु नका, असे या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.मातोश्रीबाहेर तगडा पोलीस बंदोबस्त मराठा समाजाचे कार्यकर्ते आज मातोश्रीबाहेर आंदोलन करणार आहेत. काल उद्धव ठाकरेंनी मराठा समाजाच्या आंदोलकांना भेट



दिली नव्हती. त्यामुळे मराठा समाजाने आक्रमक पावित्रा घेतला आहे. मराठा समाजाचे 150 ते 200 कार्यकर्ते आज मातोश्रीबाहेर आंदोलन करणार आहेत. या पार्श्वभूमीवर मातोश्रीबाहेर तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. उद्धव ठाकरेंनी त्यांची भूमिका स्पष्ट करावी ओबीसीमधून मराठा आरक्षण देण्याबद्दलच्या मागणीबद्दल उद्धव ठाकरेंनी त्यांची भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी मराठा समाजातील कार्यकर्त्यांकडून होत आहे. याच पार्श्वभूमीवर मराठा आंदोलक हे काल मातोश्रीवर उद्धव ठाकरेंनी भेट घेणार होते. मात्र ही भेट न झाल्याने आता कार्यकर्त्यांनी मातोश्रीसमोर आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.



चौसाळा येथे संत गजानन महाराज यांच्या पालखीचे आगमण झाले असता पालखीचे दर्शन घेताना चौसाळा पोलीस चौकीचे ठाणे अमलदार सचिन डिडुळ साहेब

# चौसाळा येथिल साहीत्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंतीच्या अध्यक्षपदी कपिल मस्के



**(बीड प्रतिनिधी)** बीड तालुक्यातील चौसाळा येथे प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी छत्रपती शाहु नगर येथे लोकशाहीर साहीत्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंती निमित्त बैठकिचे आयोजन करण्यात आले होते. भाजपा अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांच्या मार्गदर्नाखाली या बैठकिचे आयोजन करण्यात आले होते. सर्वानुमते लोकशाहीर साहीत्यरत्न आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंतिच्या अध्यक्षपदी शाहु नगर येथिल युवा कार्यकर्ते कपिल मस्के तर उपाध्यक्षपदी रवी सोनवणे तर सचिवपदी लखन सोनवणे यांची निवड करण्यात आली या बैठकिस चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर, वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश ढोकणे,एकता ग्रुपचे अध्यक्ष स्वपनील सोनवणे,जितीन काळे,आदेश बोबडे,विकास खोसे पाटील,साहील सोनवणे,विजय क्षीरसागर,कृष्णा चव्हाण,धर्मराज सोनवणे,प्रविण सोनवणे,सचिन सुरवसे पाटील,दादा गायकवाड यांच्यासह अनेक युवक मोठया संख्येने उपस्थित

# महिलांवरील अत्याचार थांबावेत यासाठी बालई काळाधोंडा ग्रामविकास परिषदेचे पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र.

## महिलांवरील अत्याचार, बलात्कार, विनयभंग आदी प्रकार घडू नयेत यासाठी उपाययोजना करण्याची पत्रातून मागणी.

**उरण दि. ३०(प्रतिनिधी )**
मुंबई, ठाणे, पालघर, रायगड येथील परिसरात कर्तव्यदक्ष महिला पोलीस अधिकारी देऊन, महिलांच्यावर होणाऱ्या बलात्कार, खून, अत्याचार याबाबत तात्काळ सुरक्षा, वेगवान न्याय, सी.सी. टिव्ही व अन्य आधुनिक सुरक्षा यंत्रणा पोलीस दलास देऊन उरणच्या यशश्री शिंदे आणि नवी मुंबईच्या अक्षता म्हात्रे आंगास्कर, श्रद्धा भोईर यांना न्याय देण्याबाबत विनंती बालई काळाधोंडा ग्रामविकास परिषदेचे सल्लागार तथा सामाजिक कार्यकर्ते राजाराम पाटील,अध्यक्ष विश्वनाथ पाटील, सचिव रविंद्र चव्हाण यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्रव्यवहारद्वारे केली आहे. जर न्याय न मिळाल्यास मातृसत्ताक महिला आंदोलनास शासनाने सामोरे जाण्यास तयार राहावे असा आक्रमक इशारा बालई काळाधोंडा ग्रामविकास परिषदेतर्फे प्रशासनाला देण्यात आले आहे. नवी मुंबई, पालघर, रायगड जिल्ह्यात घडलेल्या महिला हत्याकांड हे नवी मुंबईच्या मातृसत्ताक स्त्री सत्ताक संस्कृतीवरचा हल्ला आहे.आपल्या देशात स्त्री शुद्रातीशुद्र अर्थात स्त्रीयां आणि ओबीसी एस.सी., एस.टी. यांच्यावर अत्याचारांनी परंपरा मनुस्मृती सांगत आलीय याचा परिचय शासनाची महसूल, पोलीस प्रशासन, सिडको, नैना, जेएनपीटी, ओएनजीसी, सेझ, अलिबाग कॅरिडॉर भूसंपादन, नवी मुंबई विमानतळ प्रकल्प या सर्वच शासकीय सेवांतुन इथल्या नागरिकांना अनुभवास येत आहे.आधुनिक सोयी सुविधांनी सज्ज विकसीत मुंबई, नवी मुंबई ठाणे- रायगड पालघर येथे रेल्वे विमानतळे, मेट्रो यांच्या जाळयातुन सारा भारत आणि जगभरातुन नागरिक येथे येत आहेत. परंतु इतल्या भूमिपुत्र आणि भूमिकऱ्यांवर त्यांचे विपरीत परिणाम होत आहेत.उरण हे शहर घारापुरी, मुंबई येथील ऐतिहासिक लेण्यामुळे अडीच हजार वर्षापासून जागतिक व्यापारी केंद्र म्हणून जगाच्या नकाशावर आहे. येथे बौद्ध,



लेणी, पिरवाडी दर्गा (मुस्लीम संस्कृती) ईस्ट इंडियन, शुद्धता माता चर्च, उरण येथे, जैन, सिंधी, गुजराती, मारवाडी, व्यापारी आगरी, कोळी, कराडी, भंडारी, ओबीसी दर्यावर्दी आरमारी लोक हजारो वर्षे गुण्यागोविंदाने राहतात. त्याच्यासोबत एस.सी., एस.टी.,

## गरजू रुग्णांनी अवश्य लाभ घ्यावा-रामहरी राऊत

मागासवर्गीय आदिवासीही राहतात हे सारे मातृसत्ताक महिलाकेंद्री जीवन जगतात. उरणच्या यशश्री शिंदे या मुलींवर ज्या पद्धतीने क्रोर्याची परिसिमा करणारे अत्याचार गुन्हेगारांनी केलेत त्यामुळे इथल्या महिला वर्गामध्ये प्रचंड दहशत भितीचे वातावरण



आहे. शासनाबद्दलचा, भारतीय संविधाना बद्दलचा आदर, विश्वास धोक्यात आला आहे. याचबरोबर नवी मुंबईच्या अक्षता म्हात्रे हिच्यावर गणेश मंदिरात, देवासमक्ष ब्राह्मण पुजाऱ्यांनी केलेल्या बलात्कारामुळे आता विश्वास कोणत्या देवळावर प्रार्थना मंदिरावर, पुजाऱ्यांवर आणि धर्मावर ठेवावा ? असा प्रश्न आहे, यातुन कोणालाही धर्म सुटत नाही साहेब, उरते फक्त भारतीय संविधान.महाराष्ट्र शासनाने लाडकी बहिण योजना आणली, महिलांना प्रथमच लाडकी असल्याचा अनुभव शासनाकडून येतोय, येवढ्यात कधीही न पाहिलेले अत्याचार इथल्या महिलेच्या वाट्याला आले इथला आगरी, कोळी, कराडी, भंडारी, मुस्लीम मच्छीमार पंधरा पंधरा दिवस समुद्रावर मासेमारी करित असताना आपल्या शिलाचे, परिवाराचे, मुलांचे संरक्षण करण्यास समर्थ असणाऱ्या आगरी कोळी महिलांना उरण रेल्वे स्टेशन, नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ हे विकासाचे मार्ग बलात्कारी, खुनी, अत्याचारी उरणमध्ये घेऊन येणारे संकट ठरु नये.उरण पोलीस स्टेशनमध्ये स्त्रिया, आदिवासी, बौध्द, मातंग, चर्मकार (एस.सी./ एस.टी.) ओबीसी, अल्पसंख्यांक यांच्या तक्रारीची दखल घेण्यात पोलीस कमी पडले नसते तर अनेक घटना टाळता आल्या असत्या, यशश्री शिंदे ही तरुणी त्याचा बळी आहे.केवळ पोलीस स्टेशन नाही तर महसूल तहसील, जेएनपीटी, ओएनजीसी सागरी पोलीस, सिडको येथील अधिकारी वर्गात केवळ पैसा कमविण्याचे केंद्र म्हणजे मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, कोळीवाडे गावठाण आहेत. असा त्यांचा हेतु नाही ना ? त्यासाठी ते येथे बदल्या करून घेत नाही ना ? याचा शोध शासकीय तपास यंत्रणांनी घ्यावा. येथे आलेल्या सर्वच अधिकाऱ्यांनी किती पैसे कमविले, लोकांची किती फसवणूक केली ? याचाही शोध शासनाच्या ईडी वगैरे विभागांनी घ्यावा.रस्त्यावर सी.सी. टिव्ही लावणे गरजेचे आहे. त्यापेक्षा पोलीस स्टेशन, तहसिल महसूल या सिडको इथल्या अधिकाऱ्यांच्या कार्यालयात हे सी. सी. टीव्ही लावून मा. प्रधानमंत्री, गृहमंत्री, मुख्यमंत्री यांनी थेट पाहणे गरजेचे आहे.रात्री उशिरा कामावरुन येणाऱ्या रेल्वे, मेट्रो, विमानतळे येथून प्रवास करणाऱ्या स्त्रिया, ओबीसी, एस.सी., एस.टी., अल्पसंख्यांक नागरिकांच्या मनातुन या यशश्री शिंदेच्या वरील अत्याचारमुळे प्रचंड संताप आहे तो संवेदनशीलता, करुणा आणि संविधानिक शिस्तीने, सामाजिक न्यायाने आपण समजून घेऊन. त्वरीत कार्यवाही करावी. भारतीय नागरिकांच्या मनात शासनाबद्दल विश्वास निर्माण करावा अशी मागणी बालई काळाधोंडा ग्रामविकास परिषदेचे सल्लागार तथा सामाजिक कार्यकर्ते राजाराम पाटील, अध्यक्ष विश्वनाथ पाटील, सचिव रविंद्र चव्हाण यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तसेच महाराष्ट्र शासनाकडे केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077